अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# दर्जेदार न होण्याचाच सगळीकडे निर्धार

आपल्या देशात कोणती गोष्ट दर्जेदार आहे. याचाच शोध घ्यावा लागतो. जगातले अनेक देश इतक्या दर्जेदारपणामुळे प्रगती आणि विकास करू शकले. आपल्याकडे मात्र सरकारला आणि समाजालादेखील आपला दर्जा वाढावा असे मनापासून वाटत नाही. कोणत्याच सरकारी सेवेचा दर्जेदार सेवा म्हणून उल्लेख करता येत नाही. कोणत्याही संस्थेची सामाजिक सेवा सर्वोत्तम आणि दर्जेदार आहे असे सांगता येत नाही. उलट या दर्जाची मोजणी करण्यासाठी असलेल्या सरकारी संस्थांचा दर्जादेखील इतका खालावलेला आहे की, आपला देश इतका मागे का राहतो किंवा मागासलेला का आहे याचे त्यातून सहज उत्तर मिळते. या सगळ्या गोष्टींना आजचा शिकला सवरलेला, तंत्रज्ञान आत्मसात केलेला तरुण अक्षरश: वैतागलेला आहे. अगदी बौध्दिक क्षेत्रामध्ये किंवा शिक्षण क्षेत्रामध्ये योग्य तो दर्जा नसलेल्या संस्थांमधूनही तो शिक्षण घेतो आणि स्वत:चा व्यक्तिगत शैक्षणिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतो. तो मिळवल्यानंतर सरकारकडून किंवा समाजाकडून तशाच दर्जेदार गोष्टी मिळाव्यात अशीच माफक अपेक्षा असते. पण सरकार ती पूर्ण करू शकत नाही. आणि समाजाला वेगाने आपला दर्जा वाढावा अशी इच्छाशक्तीही दिसत नाही. आज मुंबई, पुणे, दिल्ली, बंगलोर, हैद्राबाद, अहमदाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये असा उच्च विद्याविभूषित किंवा तंत्रज्ञ शास्त्रज्ञ असलेले युवक मोठ्या संख्येने राहतात. देशभरामध्ये दहा हजारांवर अभियांत्रिकी कॉलेजेस आहेत. जवळपास दोनशे विद्यापीठे झाली आहेत. ठिकठिकाणी असलेल्या आयआयटीसारख्या किंवा व्यवसाय व्यवस्थापनाचे शिक्षण देणाऱ्या बीएमएमसारख्या संस्था विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न करतात. परंतु तिथेदेखील पाहिजे तसे शुल्क भरूनही हव्या तशा सुविधा मिळत नाहीत. अगदी मुंबई किंवा खरकपूर इथल्या आयआयटीच्या हॉस्टेल्सची अवस्था जे. जे. रुग्णालय, नायर, केईएम इथे डॉक्टर होऊ इच्छिणाऱ्या आरएमओंना दिलेली निवासस्थाने ही इतक्या निकृष्ट दर्जाची आहेत की, उद्याचा एक मोठा शास्त्रज्ञ किंवा डॉक्टर इतक्या वाईट आणि गैरसोयींनी युक्त परिस्थितीत कसा काय शिक्षण घेतो असा प्रश्न पडतो. इंजिनिअरींगचे शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना किंवा अगदी नोकरी करणाऱ्यांनासुध्दा ज्यावेळी मुंबईतल्या अतिशय टीनपाट दर्जाच्या लोकलमधून जाण्याची वेळ येते त्यावेळेला त्यांच्या या शिक्षणाचा आणि बौध्दिक क्षमतेचा सरकार आणि समाजदेखील किती घोर अपमान करते याची साक्ष पटते.

## बुद्धिमान तरुण वर्गाची अवहेलना

आम्हाला दर्जेदार व्हायचेच नाही. असा जणूकाही निर्धार सरकारी पातळीवर दिसून येतो. आज नरेंद्र मोदी मोठमाठी भाषणे झोडून जगामध्ये भारताचा डंका वाजवतील. अशा प्रकारची वल्गना करीत आहेत. परंतु भारतात येणाऱ्या लाखो पर्यटकांना इथल्या सरकारी सेवांचा जो अनुभव येतो तो घेऊनच ते भारताच्या नावाने डंका पिटत जातात. याच्या अगदी सध्या गाजत असलेले उदाहरण म्हणजे देशातील सर्वात मोठे प्रवासाचे जाळे असलेल्या रेल्वे सेवेचे देता येईल. रेल्वेतर्फे पुरवली जाणारी खानपान सेवा किती दर्जाहिन आहे, याची अनेक उदाहरणे डोळ्यासमोर येत आहेत. भरपूर भाडे घेऊन राजधानी किंवा शताब्दीसारख्या एक्सप्रेसमधून दिले जाणारे जेवण किंवा नाष्टा निकृष्ट असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. सगळ्या मोठ्या स्थानकांवर असलेली आयआरटीसीची उपहारगृहे तर इतक्या भयानक स्वरूपात असतात की, त्यापेक्षा बाहेरच्या हॉटेलात खाणे पिणे परवडले असे म्हणण्याची वेळ येते. आयआरटीसीच्या तथाकथित रिफ्रेश देणाऱ्या हॉटेल्समध्ये नाष्टा पाणी देताना प्रचंड अस्वच्छतेचा अनुभव येतो. याशिवाय बाहेरच्या दरापेक्षा थोड्या कमी किंमतीत मिळणाऱ्या या उपहारगृहांमधली गर्दी पाहून आश्चर्यदेखील वाटायला लागते. आपण प्रवाशांना ही सेवा देतो म्हणजे त्यांच्यावर उपकार करतो. असाही अनुभव येतो. अनेक ठिकाणी तर रेल्वेसाठी बनवलेले अन्न बाहेरच्या बाजारात विकण्याचेही प्रकार घडत आहेत. या साध्या एका गोष्टीतून सरकारी स्तरावरची सेवा कशी दर्जाहिन असू शकते याची साक्ष पटते.सध्या हे प्रकरण गाजत असल्यामुळे आम्ही त्याचे एक उदाहरण तुम्हाला दिले परंतु अगदी विमानसेवेपासून ते रिक्षा चालकांकडून मिळणाऱ्या वागणुकीपर्यंत कुठेही सभ्यपणा किंवा दर्जेदारपणा ठेवायचा नाही असाच निश्चय पहायला मिळतो.यातला धक्कादायक भाग असा असतो की याच सरकारी सेवांसाठी अब्जावधीची उधळण होते.पण त्या दर्जाच्या सेवा मात्र मिळत नाहीत.हे प्रकार घडण्याची अनेक कारणे जरी असली तरी त्यात भ्रष्टाचार हे सर्वात प्रमुख कारण आहे. जोपर्यंत हा भ्रष्टाचार रोखण्याच्या कठोर उपाययोजना होत नाहीत, तोपर्यंत आपल्या देशामध्ये कोणती गोष्ट दर्जेदार ठरू शकत नाही.

## भ्रष्टाचार हेच प्रमुख कारण

आजच्या तरुण पिढीला या सगळ्या दर्जाहिन कार्यपध्दतीचा अक्षरश: कंटाळा आला आहे. कारण अनेक प्रकारच्या व्यक्तिगत कौटुंबिक आर्थिक समस्यांशी झुंज देत भारतातला तरुण अगदी जगाच्या पातळीवरही चमकतो. पण त्याला सरकारकडून किंवा समाजाकडून ज्या पध्दतीच्या सुविधा आणि प्रोत्साहन मिळायला हवे ते प्राप्त होत नाही. मग आयआयटीत जाणारा तरुण जर लोकलच्या गर्दीमध्ये लोंबकळत प्रवास करत असेल तर त्याला या गैरव्यवस्थेविरुध्द संताप येणे स्वाभाविक ठरते. आणि तोच तरुण मग शिक्षण मिळवल्यानंतर शक्य तितक्या लवकर परदेशी नोकरी मिळवण्याचा प्रयत्न करतो. इथल्या समस्यांशी आणि सरकारी यंत्रणांशी झुंज देत वेळ आणि शक्ती वाया घालवणे त्याला परवडत नाही.विशेष म्हणजे त्याच्या या बुध्दीचा आणि कौशल्याचा परदेशात अधिक सन्मान होतो. तशा प्रकारच्या सोयीसुविधा किंवा दर्जेदारपणा आपल्या देशातही असावा.असे त्याला मनापासून वाटते. परंतु तसे करण्याची इच्छा असणाऱ्यांनासुध्दा सरकारी भ्रष्टाचार पुढे येऊ देत नाही. राजकारण्यांच्या हडेलहप्पीपणामुळे तरुणांच्या या गुणवत्तेला योग्य तो मान मिळत नाही. दर्जेदारपणाविषयी असलेली ही अनास्था एकूणच देशाचा फार मोठा घात करणारी आहे. प्रामुख्याने राजकारणी आणि नोकरशहा पैसे खाण्यातच दंग राहात असल्यामुळे समाज आपल्या या मूलभूत दर्जेदारपणाच्या जीवनहक्कापासून वंचित राहतो.भारताला खरोखरच पुढे यायचे असेल तर त्याला या दर्जेदारपणाचा गंभीरपणे विचार करावा लागेल.